
दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
dainiklokaarambh@gmail.com
बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | सोमवार ९ डिसेंबर २०२४ | अंक ३६५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

## कै.सुलोचनाबाई मुंडे यांचे निधन



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट तालुक्यातील मांडवा येथील जेष्ठ महिला नागरिक कै.सुलोचनाबाई संतरामजी मुंडे (वय ७२ वर्ष) यांचे दि.८-डिसेंबर रोजी सायंकाळी हृदयविकराच्या झटक्याने दुःखद निधन झाले असून सोमवार दि.९-डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता मांडवा येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.त्या गोवर्धन मुंडे,वसंत मुंडे, सत्यनारायण मुंडे यांच्या मातोश्री होत.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे पहिलं मंदिर भिवंडीत



महाराष्ट्राचे श्रद्धास्थान म्हणून ओळखल्या जाणा-या छत्रपती शिवाजी महाराज यांचे महाराष्ट्रातील पहिले मंदिर भिवंडी तालुक्यातील मराडे पाडा या ठिकाणी साकारत आहे. येत्या १७ मार्चला तिथीनुसार साज-या होणा-या शिवजयंती दिनी प्राणप्रतिष्ठा आणि मंदिराचा लोकार्पणाच्या भव्यदिव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजूभाऊ चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. याप्रसंगी प्रतिष्ठानचे पदाधिकारी ह.भ.प. कैलास महाराज निचीते, किल्ले रायगड येथील राजपुरोहित प्रकशस्वामी काशिनाथ जंगम यांसह प्रतिष्ठानचे विश्वस्त आणि सदस्य उपस्थित होते. ४ मार्च २०१८ ला भूमिपूजन झालेल्या मंदिराचे काम पूर्णत्वास आले आहे. मध्यंतरीच्या कोरोना संकटामुळे त्यामध्ये थोडा उशीर झाला असला तरी त्यानंतर अधिक जोमाने काम सुरू केले आहे. हे मंदिर फक्त दर्शनस्थळ न बनता शक्तीपीठ असावे, जेथे महाराजांचे जीवन समाजातील सर्व वर्गासाठी प्रेरणादायी राहील, असा कटाक्ष ठेवून या मंदिर उभारणीचा संकल्प केला होता, अशी माहिती अध्यक्ष राजूभाऊ चौधरी यांनी दिली आहे

## जिल्ह्याला लागलेला ऊसतोड मजुरांचा डाग पुसण्यासाठी आमदार सुरेश आण्णा धस यांना मंत्री करा- राजेश कुडके



बीड प्रतिनिधी :- जातीपातीच्या राजकारणाला कधीही थरा न देणारे सर्व जाती धर्मातील सामान्य माणसाच्या नेहमी सुखदुःखात धाऊन जाणारे महायुतीचे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे अधिकृत उमेदवार सुरेश रामचंद्र धस यांनी आष्टी विधान सभेच्या निवडणुकीत भूतो ना भविष्य अशा प्रचंड मतांनी निवडून येऊन महाराष्ट्र राज्यातील जनतेची मन जिंकली आहे त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी जाती पातीच्या राजकारणाला थरा न देताआष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात ऐतिहासिक विजय मिळवनार्या एआमदार सुरेश आण्णा धस यांना पक्षश्रेष्ठींनी महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्रीपदी संधी द्यावा अशी मागणी युवा नेते राजेश कुडके यांनी केली..

## साहित्य

साहित्य म्हणजे अमर्याद
शब्दाचा खरा साठा आहे
सागर किनारी तरंगणा-या
फेसाळलेल्या त्या लाटा आहे...१

साहित्य एक निर्मळ
खळखळणारा झरा आहे
चंद्रमाच्या सोबतीला तो
चकाकणारा तारा आहे.....२

साहित्य म्हणजे पैंजणाची
छन,छन झनकार आहे
हृदयाच्या स्पंदनाला देणारा
बोलका आकार आहे......३

**सौ.ज्योत्स्ना भास्कर बन्सोड**
**कुरखेडा,जि.गडचिरोली**



बीड-महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरातील पेठ बीड भागातील पूर्णाकृती पुतळ्यास डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी माजी नगरसेवक गणेश वाघमारे, अशोक वाघमारे, जयश्रीताई विधाते, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुकाध्यक्ष संगीताताई वाघमारे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.









दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ९ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## अखेर एकनाथ शिंदे मंत्रीमंडळात सामील

शपथविधीच्या काही तासांपर्यंत शिंदे उपमुख्यमंत्रीपद स्वीकारणार की नाही, ही संदिग्धता कायम होती, हाही असाच विनोद. इलेक्ट्रॉनिक माध्यमे बराच काळ या विनोदावर चर्चा करत राहिली. त्यांचे ठीक. एरवीही वेळ कसा भरून काढायचा असा प्रश्न त्या बिचाऱ्यांस असतो. शिंदे यांनी काही काळापुरता तरी तो सोडवला. तथापि निवडणुकांचे निकाल लागले त्या दिवसापासून काही गोष्टी सूर्यप्रकाशाइतक्या स्पष्ट होत्या. मुख्यमंत्रीपद भाजपकडे जाणार, मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांचीच निवड केली जाणार आणि एकनाथ शिंदे–अजितदादा यांना उपमुख्यमंत्रीपदावर समाधान मानावे लागणार. यातील अजितदादांचा प्रश्न नाही. ते उपमुख्यमंत्रीपदाला चटावलेले आणि सरावलेलेही आहेत. या पदावर समाधान मानण्याची त्यांची चिकाटी तशी कौतुकास्पद. अर्थात त्याखेरीज त्यांना पर्याय नाही, हेही खरेच. हेच सत्य एकनाथ शिंदे यांच्याबाबतही लागू होते. पण त्यांना ते स्वीकारणे जड जात होते. साहजिक आहे तसे होणे. मुख्यमंत्रीपदावरून उतरायचे आणि लगेच उपमुख्यमंत्रीपदावर समाधान मानायचे ही अवघड बाब. पण ती गोड मानून घेण्याखेरीज त्यांस पर्यायही नाही. तो नव्हताही. त्यामुळे ङ्गशिंदे हे उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार की नाहीफ या प्रश्नास तो विचारण्यास सुरुवात झाल्यापासून अर्थ नव्हता. जे झाले ते नाटक होते. तेही अगदीच किरकोळ आणि लुटुपुटुचे. या नाटकात खुद्द शिंदे यांची नायकाची भूमिका काढून घेतली गेलेली असताना त्यांच्या बाकीच्या प्याद्यांच्या आवेशास काहीही अर्थ नाही. हे वास्तव लक्षात घेतल्यास शिंदे यांची अडचण सहज समजून घेता येईल. म्हणजे २०२२ पर्यंत त्यांचा काळ आधी बाळासाहेब ठाकरे आणि नंतर उद्धव ठाकरे यांच्या सावलीत गेला. आपण आनंद दिघे यांची सावली होतो, याचा तर शिंदे यांना अभिमान होता. त्याही काळात त्यांना महत्त्व होते. पण सावलीत राहून. नंतरच्या बंडामुळे त्यांना मुख्यमंत्रीपद मिळाले. त्यामुळे या पदाच्या सावलीत त्यांना पुढची अडीच वर्षे वावरता आले. या पदाची ताकदच अशी असते की बाबासाहेब भोसले, शिवाजीराव निलंगेकर पाटील आदी तुलनेने चेहराशून्य नेत्यांनाही मोठे करते. त्या तुलनेत शिंदे यांचे कर्तृत्व निश्चितच लक्षणीय आहे. शिवसेनेसाठी महत्त्वाचा ठाणे जिल्हा त्यांनी आपल्या खांद्यावर उचलून धरला होता. त्यात त्यांची कष्ट करण्याची क्षमता. यामुळे खरे तर सेनेत असतानाही मुख्यमंत्रीपदाचे दावेदार ठरू शकले असते. पण ते पद न मिळाल्यामुळे आणि मिळण्याची शक्यताही नसल्यामुळे भाजपने त्यांना हेरले आणि फुटीच्या जाळ्यात शिंदे सहज ओढले गेले. त्यात भाजपने त्यांना मुख्यमंत्री केल्यामुळे शिंदेंचा पुढचा प्रवास सुलभ झाला. त्या प्रवासात शिंदे यांना मिळालेला आधार दुहेरी होता. एक म्हणजे मुख्यमंत्रीपदाने दिलेला आणि दुसरा हे पद देणाऱ्या भाजपच्या ङ्गमहाशक्तीफ कडून मिळत असलेला. पण निवडणुका झाल्या, भाजपने स्वत:च्या घवघवीत यशासाठी आखलेली चतुर समीकरणे यशस्वी ठरली. त्याचा थेट परिणाम म्हणजे शिंदे यांनी हे दोन्हीही आधार गमावले. मुख्यमंत्रीपद त्यांना भाजपच्या यशामुळे नाकारले गेले आणि ते पद नसल्यामुळे दिल्लीच्या ङ्गमहाशक्तीफ चीही त्यांना आधार देण्याची गरज संपली. म्हणजे यापुढे शिंदे यांना जी काही उरलीसुरली शिवसेना आहे, ती स्वत:च्या बळावर चालवावी लागेल. या शिवसेनेच्या यशात यापुढे भाजपला स्वारस्य असेलच असे नाही. त्या पक्षास रस होता मूळ शिवसेना फोडण्यात. त्यात ते यशस्वी झाले. आता ङ्गअर्धफ मेल्या शिवसेनेचे काय करायचे हा त्या शिवसेनेच्या नेत्यांचा प्रश्न. भाजपस त्यात रस असण्याची शक्यता नाही. तथापि याच विधानाचा पुढचा भाग असा की शिंदे यांच्या साजिंद्यांनाही त्यांच्या शिवसेनेत यापुढे रस असेलच असे नाही. खरे तर या मंडळींसमोर शिवसेना काय आणि भाजप काय वा राष्ट्रवादी काय किंवा काँग्रेस काय, हे मुद्देच नाहीत. त्यांचे लक्ष्य होते/ आहे/ असेल ते फक्त सत्ता या एका घटकात. ती जो देईल त्यामागे ही प्यादी धावतील. त्यामुळे ङ्गशिंदे सरकारात सहभागी झाले नाहीत तर आम्हीही मंत्रीपद स्वीकारणार नाहीफ या यातील काही नेत्यांच्या आविर्भावावर तान्हे, शेंबडे, अगदी दुपट्यातले पोरही विश्वास ठेवणार नाही. सत्य असे की शिंदे यांनी खरोखरच मंत्रिमंडळात सहभागी न होण्याचा निर्णय अंमलात आणला असता तर यातील काहींनी भाजपच्या दारात जाऊन आमच्या पदरात काही तरी वाढा, अशी भिक्षा मागण्यास कमी केले नसते. शिंदे नाहीत तर नाही, आम्हाला तरी काही द्या, असाच या मंडळींचा पवित्रा राहिला असता. आणि याची जाणीव असल्यानेच शिंदे यांनी मंत्रिमंडळात सहभागी होण्याचा शहाणपणा दाखवला. अन्यथा तेलही गेले, तूपही गेले या उक्तीप्रमाणे त्यांच्या हाती धुपाटणेही राहिले नसते. हीच बाब अजितदादा यांची. ते उगाच मंत्रिमंडळात मी जाणार नाही वगैरे नैतिक भूमिका घेण्याच्या फंदात पडले नाहीत. कायम सत्तासावलीत राहिलेले असल्याने त्यांच्यासाठी सत्तेखेरीज जगणे म्हणजे माशास पाण्याबाहेर जगावे लागण्याइतकेच अवघड. ती वेळच त्यांनी येऊ दिली नाही. हे दोघे काही महत्त्वाच्या खात्यांसाठी आग्रही असल्याचे सांगितले जाते. त्यातही फार तथ्य नाही. भाजप देईल ती खाती या उभयतांस स्वत:साठी आणि आपापल्या साजिंद्यांसाठी स्वीकारावी लागतील. उगाच ङ्गगृह खाते मलाच हवेफ आणि ङ्गअर्थ खात्यावर माझा अधिकारफ वगैरे शौर्यदर्शक विधानांमुळे कोणीही बधणारे नाही. त्यास इलाजही नाही. जे भाजप म्हणेल तेच त्यांस ऐकावे आणि करावे लागेल. म्हणून यापुढील काळात या पक्षांच्या अस्तित्वाचा प्रश्न त्या पक्षांपेक्षा भाजपलाच अधिक पडणार आहे. याचे साधे कारण असे की भाजपस यापुढील काळात या पक्षांच्या अस्तित्वाची अजिबात गरज नाही

## बाबा तुमच्या चळवळीची ६८ वर्षात कशी दुर्दशा झाली?

सर्गाचा नियम आहे जो जन्मा येतो.तो एक दिवस मृत्यू पावतो.निसर्ग नियमाने सर्वच प्राणी माणस जगतात,काही खाण्यासाठी जगतात तर काही जगण्यासाठी खातात.कोण किती दिवस जगला त्याला काही महत्व नाही.कसा जगला आणि काय केले, त्याला जगात खूप महत्व आहे.भारतात असा एकमेव व्यक्ती आहे जो केवळ एक पाव खाऊन व दोन गिलास पाणी पिऊन शिक्षण घेत होता.त्याच्या त्या परिश्रमाने त्यागाने त्याने आपले नांव अजरामर करून ठेवले तो जाऊन आज ६८ वर्ष झाले तरी त्याला देश विसरल्याला तयार नाही. असा एकमेव पुरुष नव्हे तर महापुरुष म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्याच्या मृत्यूला महापरिनिर्वाण दिन म्हणतात.तो बहुजन समाजा करिता दुखाचा दिवस आहे,असे म्हटल्या जाते. पण गेल्या काही वर्षा पासून महार, दलित, बौद्ध समाज व त्याच्या संस्था, संघटना,पक्ष महापरीनिर्वाण दिन आहे हे विसरले आहेत.महापरीनिर्वाण दिनाला जत्रेचे स्वरूप आले आहे.जत्रेतील गर्दी वर्ड रिकार्ड तोंडणारी आहे.पण राजकीय वैचारिक शक्ति त्यात दिसली नाही.लोकसभा विधानसभा निवडणूक संपल्या आमच्या संघटना पक्ष आणि समाज कुठेही दखल पात्र ठरला नाही. पक्षाचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांना सिंहा सारखे जगावे लागते.समोरून पहिले तर प्रत्येकांना त्याच्या नजरेत भय आणि आदर वाटला पाहिजे.आणि मागून पहिले तर तो अनेकांचे तिरस्काराचे बाण खाऊन रक्त बंबाळ झालेला असतो. ते आज पर्यत कोणीच मनावर घेतले नाही, त्यामुळे सामाजीक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धर्मिक, राजकीय संस्था,पक्ष संघटना एक नां धड भराभर चिंद्या झाल्या आहेत. क्रांतीकारी विचारधारा तोंडात असते आणि आचरणात लाचारी. यामुळेच पक्ष संघटना वाढत नाही.पक्ष, संघटना एकखांबी नेतृत्व झाल्या आहेत. त्यासाठी लोकशाहीच्या नांवावर लाचारी करणारे एकखांबी नेतृत्व निर्माण झाले आहे.गोरगरिबांना न्याय देणारी न्याय व्यवस्था राहिली नाही.गरीब कार्यकर्त्यांना लाथा,आणि श्रीमंत कार्यकर्त्यांना पायघड्या देणारे नेतृत्व जास्त काळ टिकत नाही.ते नेहमीच अस्तित्वासाठी तडजोड करीत असते.त्यात त्याचे कोणतेही नुकसान होत नाही. नुकसान हे समाजाचे व चळवळीचे होते. त्यावर चर्चा होत नाही. लोकसभा विधानसभा निवडणुकीत एड. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीची लक्षवेधी भूमिका ठरत होती. तिच्या बदल खोटा प्रचार करण्याचे काम सोन्याचे, चांदीचे, स्टीलचे चमचे बुद्धिजीवी विचारवंत, साहित्यिक, संपादक, लेखक, सेवानिवृत अधिकारी, सुरक्षित नोकरी करणारा आरक्षणचा लाभार्थी अशी मंडळी इमानदारीने करीत होती हे आपण सोशल मिडियावर वाचले व पाहिले असेलच.२३ नोव्हेंबर नंतर या सर्वांचा सर्व पातळीवरून कसा धुवा उडाला हे आपण पहिले आहे. म्हणून म्हणतो बघाना बाबा तुमच्या चळवळीची ६८ वर्षात कशी दुर्दशा झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे क्रांतिकारी विचार समाजाने वाजोटे ठरविले आहेत. या देशातील विविध जाती धर्माचे प्रांताचे लोक भारतीय संविधानाने एकत्र राहू शकतात असे अनेक विचारवंत सांगतात.हे जर शंभर टक्के खरे आहे. तर आंबेडकरी समाज एकसंघ का राहू शकत नाही.ज्यांनी ज्यांनी संविधान स्वीकारले त्याचा स्वभिमान जागा झाला आहे.त्याचे कल्याण व विकास झाला आहे. त्यामुळेच विविध संस्था, संघटना, पक्ष निर्माण होतात त्यांनी संविधानाच्या चौकटीत काम केले तर त्या वाढतात.नाही केले तर संपतात. बाबासाहेबाच्या समता सैनिक दलाच्या धर्तीवर राष्टीय स्वयंसेवक संघ (आर एस एस) निर्माण झाली असे सांगितल्या जाते.त्याच्या हजारो वेगवेगळ्या संस्था संघटना असल्या तरी त्याचे सामाजिक, शौक्षणिक, राजकीय उधिस्ट एक असते. म्हणून ते किती हि वेगवेगळे असले तरी एक असतात.या उलट आंबेडकरी चळवळीचे झाले आहे.ते विचाराने कितीही एक असले तरी ते कधीच एक नसतात, मग तो अन्याय, अत्याचार, हत्याकांडाची रमाबाई, खैरलांजी, सोनई, खडी, जवखेडा असो.ते वेगवेगळे लढणारच. मग सांगा यांना एक बाबासाहेब मान्य आहे काय?. त्याच बाबासाहेबांनी लिहलेली भारतीय राज्यघटना, संविधान यांना मान्य आहे काय?.जर हे मान्य असेल तर कोणत्याही कुटुंबाची दुर्दशा होणारच मग ते प्रकाश असो की आनंद, उद्धव असो कि राज,तशी चळवळीची ही दुर्दशा होणारच कारण त्याला कोणतीही निमावली लागू नाही. महापरिनिर्वाण दिन एकाच महापुरुषाचा देशात मानला जातो.देशात अनेक सम्राट हृदय सम्राट झाले.त्याचा स्मृर्तीदिन कधी आला आणि गेला तो कोणाला कळत सुद्धा नाही.पण डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे महामानव आहेत त्याच्या स्मृतीदिनाची जगात दखल घेतल्या जाते. त्याच्या त्या महापरीनिर्वाण दिनाला काही लोक मोठ्या प्रमाणात गालबोट लावण्याचा प्रयत्न करतात. कोण आहेत ते ?.शिवाजी पार्क आणि परिसरात खेळणे,कपडे विकू नये असे सांगितल्या जाते.तरी मोठ्या प्रमाणात दुकाने का लागतात. मग दुकानदार कोण व खरीददार कोण?. कॅसेट सीडी चा मोठा आवाज करून गोंगाट करू नका असे पोलीस विनती करून सांगतात.तरी त्यांना न जुमानता आवाज करणारे कोण?. संविधानाच्या कलमानुसार पोलिसांनी कारवाई केली. तर काय होईल?. यावर चळवळीच्या नेत्याचे नियंत्रण आहे काय?. काय करते महापरीनिर्वाण समन्यव समिती?. चैत्यभूमी विकास समिती ?. हे काही करू शकणार नाही.कारण यांना संविधानच मान्य नाही.काही कार्यकर्त्याची, नेत्याची वर्षभराची कमाई (एक ते आठ डिसेंबरमध्ये) या मधून होते असे अनेक अधिकारी खासगीत सांगतात.त्यामुळे महापरीनिर्वाण दिनाला हिणकस वळण लागताना दिसत आहे. त्याला एक नेता,एक संघटना, एक पक्ष जबाबदार नाही. त्याला जबाबदार आहे आंबेडकरी चळवळ आणि समाज जबाबदार आहे त्यामुळे आंबेडकरी चळवळीची दुर्दशा झाली. चळवळीची दुर्दशा होण्यासाठी काही कॉम्रेड नी हातभार लावला असे म्हणणे चूक ठरणार नाही.इतर समाजाला महापरीनिर्वाण दिवसाचा खूप त्रास होतो,त्यांना एवढी गर्दी पाहून धडकी भरते ते माणस आहेत हेच काही लोकांना मान्य नाही त्याच्या अंगावरील कपड्याचा घाण वास येतो ते परिसारत घाण करतात.असे अनेक आरोप लावल्या जातात. बहेच आरोप लावणारे इतर समाजाच्या नऊ / दहा दिवस चालणाऱ्या धांगडधिंगाला मोठया उत्सवाने स्वीकारतात. त्याचा वाहतूक, ध्वनी प्रदूषण, त्याच्या कडून घाण होत नाही का?. त्याची तुलना महापरीनिर्वाण दिनाशी होत नाही. आंबेडकरी चळवळ संघटना पक्षा बाबत त्यांना विचारले तर जे सत्य सांगणार नाहीत माहित असून त्यांना या बाबत विचारणे म्हणजे आंबेडकरी चळवळीत असंतोष पसरविणे नाही काय? बाबसाहेब च्या वेळी जिवाला जिव देणारे सहकारी आंबेडकरी चळवळीत होते अनेक समस्या वर अभ्यासपूर्ण माहिती घेवुन ते संघटना पक्ष चालवत होते.आजचे कार्यकर्ते नेते वाट पाहतात कधी कुठे पुतळ्याची विटंबना होते कुठे आमच्या आया बहिणीची इज्जत लुटली जाते कुठे अन्याय अत्याचार आणि हत्याकंड घडते आणि आम्ही मोर्च्या आंदोलन करून तोडपानी करतो त्याचे भांडवल करून आमच्या नांवाची पार्टी बनवितो.काही घडलेच नाही तर आम्ही गप्प बसणार नाही पुतल्याची स्वछता करून सुशोभीकरण करा.नाही तर आम्ही आमरण उपोषण करतो. या रेल्वे स्टेशनला हे नांव द्या नाही तर ते करतो अशी ही चळवळ बाबासाहेबाची होती काय?. महापरी निर्वाण दिनी जन आंदोलन करून नेते बनू पाहणारे खरेच आंबेडकर वादी असू शकतात काय ?.याच्या घरी यांचा माय बाप मेले असते. त्या दिवसी यांनी असे आंदोलन केले असते?.याच दिवसी जेलभरो करून,सामुहिक आत्मदहन करणारे आंबेडकरी विचार आणि चळवळ पुढे नेणारे असू शकतात?.यांनी कोणी केली ही चळवळीची दुर्दशा?.माझ्या तमाम जागृत समाज बांधवा नो हिच वेळ आहे आपल्या बाबाच्या महापरीनिर्वाण दिनाच्या दिवशी आत्मचिंतन करण्याची आता किती वेळ सांगणार इतिहास वाचल्या वर इतिहास घडविता येतो. येणारी पीढी आपला ५० वर्षाचा इतिहास वाचेल.तेव्हा सांगा त्याना नामांतर साठी किती वर्ष लढ़लो आणि नामविस्तर करून समाधान पावलो. पुतला विटंबना झाल्या मुले रमाबाई हत्याकांड घडले.मनोहर कदम चे काय झाले. खैरलांजी, सोनाई, खर्डा, जवखेडा हत्याकंडाचा इतिहास लिहावा लागेल ते पुढील पिढी वाचेल नंतर बाबासाहेबाचा इतिहास वाचेल. तेव्हा ते विचारतील सांगना बाबा तुमच्या चळवळीची ६८ वर्षात कशी दुर्दशा झाली. बाबासाहेबाना विनम्र अभिवादन करताना हा प्रश्न प्रत्येकानी स्वताला विचारवा हेच खरे विनम्र अभिवादन असेल.

## मविआला विरोधी पक्षनेतेपद मिळणार की नाही?

प्रतिनिधी विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळालं आहे. त्यामुळं राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार स्थापन झालं आहे. देवेंद्र फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे उपमुख्यमंत्री झाले आहेत. मात्र, विरोधी पक्षनेतेपदसाठी आवश्यक असणाऱ्या जागा देखील महाविकास आघाडीला मिळाल्या नाहीत. त्यामुळं मविआला विरोधी पक्षनेतेपद मिळणार की नाही? अशी चर्चा सुरु आहे. अशातच राहुल नार्वेकर यांनी एक सूचक वक्तव्य केलं आहे. नेमकं काय म्हणालेत नार्वेकर ते पाहुयात. विधानसभेत विरोधी पक्षनेता कोण असेल यासंदर्भात विधानसभा अध्यक्षांचा अधिकार असतो. नियमात ज्या गोष्टी असतील त्याद्वारे सगळं होत असते असे राहुल नार्वेकर म्हणाले. माझ्याकडे गोष्टी आल्यास आम्ही विचार करुन निर्णय घेऊ. २८८ आमदारांना न्याय दिला नाही तर जनतेबरोबर अन्याय होतोय असं वाटेल. संसदीय लोकशाहीसाठी सर्वांना न्याय देणं फार महत्त्वाचं असल्याचे नार्वेकर म्हणाले. माझ्या कार्यकाळात सर्वाधिक लक्षवेधी मांडल्या गेल्याचे नार्वेकर म्हणाले. डिजिटलायझेशन देखील सर्वाधिक माझ्या काळात झालं आहे. अडीच वर्षात सकारात्मक काम झालं आणि त्यादृष्टीने पुढील ५ वर्ष देखील प्रयत्न असेल असंही ते म्हणाले. सेंन्ट्रल व्हिस्टा संदर्भात लवकरच विचार करु, नवीन विधान भवनासंदर्भात निर्णय विचाराधीन असल्याची माहिती देखील नार्वेकरांनी दिली. शिवसेना ठाकरे गटाचे दोन आमदार शपथविधीला अनुपस्थित होते. यामध्ये वरुण सरदेसाई हे एक आहेत. ते पूर्वनियोजित दौऱ्यामुळे मुंबई बाहेर असल्याकारणाने शपथ घेऊ शकले नाहीत. तर मनोज जामसुतकर यांची तब्येत ठीक नसल्याने आणि रुग्णालयात उपचार घेत असल्याने शपथ घेऊ शकले नाहीत असे नार्वेकर म्हणाले. माझ्यावर देखील टिका झाल्या आहेत. टीका व्यतिरिक्त विरोधकांनी काही केलं नाही. मी उद्यापासून विधानसभा अध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडेल तेव्हा साथ लाभेल असेही नार्वेकर म्हणाले. कोणताही पक्षपात न करता निर्णय घेऊ. मला आज कुठल्याही विषयावर राजकीय भाष्य करायचं नाही जनतेनं आपल्या मॅन्डेटवरुन दाखवून दिलेलं आहे, असंही नार्वेकर म्हणाले. मी सर्वांचे आभार मानतो. कुठल्याही गोष्टीची जबाबदारी दिली जाते



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ९ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# नवनिर्वाचित २८० आमदारांनी घेतली शपथ

## ८ जण शपथविधीला आलेच नाहीत

आज ११४ पैकी १०६ आमदारांनी शपथ घेतली आहे. अद्याप ८ आमदारांचा शपथविधी बाकी आहे, शपथविधी सोहळ्यात ८ आमदार अनुपस्थित असल्याची माहिती समोर आली आहे. उत्तमराव जानकर, विलास भुमरे, वरुण सरदेसाई, मनोज जामसुतकर, विनय कोरे, जयंत पाटील, शेखर निकम, सुनिल शेळके हे आमदार अनुपस्थित असल्याची माहिती आहे. उद्या उर्वरित काही आमदार शपथ घेणार असल्याची माहिती आहे. याउलट काही आमदार विधानसभा अध्यक्षांच्या दालनात शपथ घेतील. शिवसेना ठाकरे गटाचे दोन आमदार शपथविधीला अनुपस्थित होते. आजच्या शपथविधीसाठी शिवसेना ठाकरे गटाचे दोन आमदार शपथविधीला अनुपस्थित होते. वरूण सरदेसाई आणि मनोज जामसुतकर हे आमदार गैरहजर होते. वरूण सरदेसाई यांचा पूर्वनियोजित दौरा असल्यामुळे मुंबई बाहेर असल्या कारणाने शपथ घेऊ शकले नाहीत तर मनोज जामसुतकर यांची तब्येत ठीक नसल्याने आणि रुग्णालयात उपचार घेत असल्याने शपथ घेऊ शकले नाहीत अशी माहिती समोर आली आहे. तर आमदार शेखर निकम यांचा मुलगा ऑस्ट्रेलियाला शिक्षण घेतो. त्याच्या कॉन्व्होकेशनचा कार्यक्रम आहे. त्यासाठी पालक उपस्थित असणं गरजेचं आहे. त्यामुळे निकम हे ऑस्ट्रेलियाला गेले आहेत. यापूर्वी मुलाच्या कॉन्व्होकेशनला दोन ते तीन वेळा ते गैरहजर राहिले होते. पण यावेळी मात्र ते आवर्जून उपस्थित आहे. त्यामुळे त्यांनी आमदारकीची शपथ घेतली नाही. विशेष अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधान भवनात मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी आमदारकीची शपथ घेतली. यानंतर नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी पार पडत असतानाच काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे नाव पुकारले असता सर्व आमदार बाहेर पडले. तसेच ईव्हीएमच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षांच्या आमदारांनी शपथ न घेता कामकाजावर बहिष्कार टाकला होता.

### बीड जिल्ह्यातील या आमदारांनी घेतली शपथ



महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांचे निकाल काही दिवसापूर्वीच समोर आले आहेत. त्यामध्ये महायुतीला मोठे यश प्राप्त झाल्याचे दिसून आले. यामध्ये बीड जिल्ह्यातील बीड मतदार संघ वगळता सर्व ठिकाणी महायुतीचे उमेदवार विजयी झाल्याचे पहावयास मिळाले. रविवारी आमदारांचा शपथ विधी सोहळा असल्याने जिल्ह्यातील सर्व आमदारांनी शपथ घेतल्या आहेत. यामध्ये बीड मतदार संघातून आ.संदीप क्षीरसागर, परळी मतदार संघातून आ.धनंजय मुंडे, माजलगाव मतदार संघातून आ.प्रकाश सोळंके, गेवराई मतदार संघातून आ.विजयसिंह पंडित, आष्टी-पाटोदा-शिरूर मतदार संघातून आ.सुरेश धस, केज मतदार संघातून आ.नमिता मुंदडा यांनी शपथ घेतल्या आहेत.

---

# गर्भावस्थेत विधिमंडळाच्या दाराशी:; भाजप महिला आमदाराची भावूक पोस्ट

आई: तुम्ही कुठल्याही क्षेत्रात काम करत असाल तर आईपण तुम्हाला अधिक बळ देतं. एखादी स्त्री जर आई झाली तर ती अधिक ताकदीने संकटांना सामोरी जाते. तिचं आईपण कधीच तिच्या कामाच्या आड येत नाही, हे अनेक महिलांनी सिद्ध केलं आहे. राजकीय जीवनात वावरत असताना नेत्यांच्या पाठीमागे कामाचा ताण असतो. लोकांच्या भेटीगाठी असतात. अशात कुटुंबाला वेळ देणं तसं पाहिलं तर तारेवरची कसरत असते. पण जर तुम्ही आई असाल तर मात्र आपल्या मुलांसाठी तुम्ही वेळ काढताचः. बीडमधील केडच्या आमदार नमिता मुंदडा या लाडकी लेक वियानाला घेऊन अधिवेशनाला आल्या होत्या. याबद्दल त्यांनी फेसबुकवर भावूक पोस्ट शेअर केलीय. लेक



वियाना ही दोन महिन्यांची होती, तेव्हा नमिता मुंदडा तिला घेऊन विधिमंडळात आल्या होत्या. त्यावेळी दोन महिन्यांच्या लेकीला घेऊन विधिमंडळात आल्याने प्रचंड चर्चा झाली होती. आता नमिता यांची लेक वियाना पाच वर्षांची झाली आहे. तिला घेऊन नमिता मुंदडा विधिमंडळाच्या अधिवेशनात आल्या होत्या. फडणवीस सरकारचं पहिलं विशेष अधिवेशन होत आहे. या विशेष अधिवेशन काळात नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी पार पडला. या पहिल्या दिवशी नमिता लेक वियानाला घेऊन आल्या होत्या.नमिता मुंदडा यांची फेसबुक पोस्टपाच वर्षांपूर्वीची ती सकाळ अजूनही माझ्या मनात कोरलेली आहे. गर्भवती अवस्थेत, हृदयात असंख्य स्वप्नं, भीती आणि अनेक जबाबदा-या घेऊन मी पहिल्यांदा विधिमंडळाच्या दाराशी उभी होते. माझ्या पोटात वाढत असलेल्या छोट्या जीवाने मला त्या क्षणाला आधार दिला, जणू तिच्या स्पंदनातून ती म्हणत होती आई, तू हे करू शकतेस !आज पाच वर्षांनंतर तीच माझी चिमुकली कन्या वियाना आता पाच वर्षांची झाली आहे. तिच्या छोट्या हातात हात धरून पाच वर्षांनंतर पुन्हा एकदा मी शपथविधिच्या निमित्ताने विधिमंडळाच्या दारात उभी आहे. हा क्षण माझ्यासाठी एक आमदार म्हणूनच नव्हे तर एक आई म्हणून खूप आनंददायी आहे.

---

# गायब झालेली थंडी आता पुन्हा येणार हवामान अभ्यासकांनी वर्तविला अंदाज

दक्षिणेकडील चक्रीवादळने पळवून लावलेली थंडी उत्तरेकडून वाहणा-या वा-यामुळे पुन्हा एकदा जोर पकडणार आहे. ८ ते १३ डिसेंबरदम्यान राज्यातील शहरांचा पारा १०, तर मुंबई महानगरातील शहरांचा पारा १६ अंशांच्या आसपास नोंदविण्यात येईल, असा अंदाज हवामान अभ्यासकांनी वर्तविला आहे. परिणामी, आठवडाभर गायब असलेली थंडी आता कमबॅक करणार आहे.

नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात राज्यातील शहरांचा किमान तापमानाचा पारा १० अंशांवर आला होता, तर मुंबई १६ अंशांवर उतरली होती. मात्र, हवामानात झालेल्या उल्लेखनीय बदलामुळे गेल्या आठवड्यात किमान तापमानात वाढ झाली. राज्याच्या बहुतांशी भागात हवामान ढगाळ नोंदविले गेले. काही ठिकाणी अवकाळी पावसाची नोंद झाली. आता हवामान पालटणार असून, राज्यासह मुंबईला थंडीची मजा लुटता येणार आहे.

**उत्तर मध्य महाराष्ट्रातील शहरांच्या किमान तापमानात ब-यापैकी घसरण होईल. मराठवाड्यातही तापमान खाली येईल. कमाल ३५ आणि किमान तापमान १० ते १३ अंश नोंदविले जाईल. विदर्भातही हलक्याशा थंडीची नोंद होईल, तर मुंबईसह लगतच्या परिसरातील शहरांचे किमान तापमान १३ ते १५ अंश नोंदविली जाईल.**

**- अश्रेया शेट्टी, हवामान अभ्यासक,**

---

# लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात संत श्री संताजी जगनाडे महाराजांची जयंती साजरी ;

## जगनाडे महाराजांचे विचार आणि साहित्य प्रेरणादायी सामाजिक बांधिलकी जपत ऐक्याचा संदेश देणारे :- डॉ.गणेश

लिंबागणेश:- ( दि.०८ ) बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालयात आज दि.०८ रविवार रोजी संत श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन प्रगतिशील शेतकरी सुदाम रणखांब यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून श्रीफळ फोडून मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत कर्मचारी जीवन मुळे, सुखदेव वाणी, कचरू निर्मळ,मधुकर रणखांब, जयदेव गिरे, शेषेराव थोरात आदि



उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मधुकर रणखांब यांनी केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष बालासाहेब जाधव यांनी आभार मानले.

संत संताजी जगनाडे महाराजांचे वारकरी संप्रदायाचे विचार आणि साहित्य प्रेरणादायी ; सामाजिक बांधिलकी जपत ऐक्याचा संदेश देणारे :- डॉ.गणेश ढवळे

---

श्री संत संताजी जगनाडे यांच्या महतीचा जीवनपट उलगडताना त्यांचे वारकरी संप्रदायाचे विचार आणि साहित्य हे प्रेरणादायी असुन सामाजिक बांधिलकी आणि ऐक्याचा संदेश देणारे आहे.जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या जीवनकार्याचा मोठा प्रभाव त्यांच्या मनावर होता.तुकाराम महाराजांच्या किर्तनातील प्रमुख १४ टाळक-यांपैकी प्रमुख असणारे संताजी जगनाडे महाराज यांना तुकाराम महाराजांच्या गाथा इंद्रायणी नदीमध्ये बुडवल्यानंतर सुद्धा त्याचे पुन:र्लेखन जगनाडे महाराजांनी केल्याने आपणास त्यांची महती कळत असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी प्रतिपादन केले.

---

### विजयसिंह पंडित आमदार व्हावेत म्हणून केसापुरी परभणीचे सरपंच महेश शिंदे यांनी केला होता नवस.


# नवस्फुर्तीसाठी महेश शिंदे पायी अक्कलकोटकडे रवाना



गेवराई तालुक्याचे तडफदार नेतृत्व विजयसिंह पंडित आमदार व्हावेत म्हणून देहवेडे सरपंच महेश शिंदे यांनी अक्कलकोट येथील स्वामी समर्थ यांना नवस केला होता त्यांच्या नवसाला स्वामी समर्थ पावल्याची प्रचिती दिसून आली त्यामुळे केसापुरी परभणीचे सरपंच महेश शिंदे हे विजयसिंह पंडित आमदार व्हावेत म्हणून केलेल्या नवसाची पूर्ती करण्यासाठी परभणी केसापुरी ते अक्कलकोट हे जवळपास २३५ किलोमीटरचे अंतर चालत जाण्यासाठी दि. ०७ डिसेंबर रोजी सकाळी ३ वाजून ५५ मिनिटांनी रवाना झाले आहेत. पहिला मुक्काम त्यांनी धारूर येथे केला असून त्यानंतर कळंब, येडशी, तुळजापूर, इटकळ व अक्कलकोट अशी त्यांची संभाव्य मुक्कामाची ठिकाणे असतील. त्यांच्याबरोबर त्यांचा मित्र परिवार देखील त्यांच्या या पदयात्रेत सहभागी आहे. साधारणत: ते येत्या १५ डिसेम्बर म्हणजेच रविवार पर्यंत अक्कलकोट येथे पोहोचतील व स्वामी समर्थांच्या चरणी नतमस्तक होतील अशी माहिती त्यांचे मित्र व गावकरी इंजि. संग्राम कवचट यांनी दिली.

---

# एकनाथ शिंदे यांनी पत्ते उघडले, या नेत्याची मुख्य प्रतोद पदी नियुक्ती, आमदारांना तातडीने व्हीप जारी



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या मुख्य प्रतोद पदी रमेश बोरनारे यांची निवड करण्यात आली आहे. रमेश बोरनारे हे वैजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. त्यांची आता शिवसेनेच्या मुख्य प्रतोद पदी निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे मुख्य प्रतोद पदी निवड झाल्यानंतर लगेच रमेश बोरनारे यांनी शिवसेनेच्या सर्व ५७ आमदारांसाठी व्हीप जारी केला आहे. विधिमंडळाचं सध्या विशेष अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनाचा उद्या शेवटचा दिवस आहे. विशेष अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विधानसभेच्या सभागृहात विश्वास दर्शक ठराव मांडण्यात येणार आहे. यावेळी सभागृहात उपस्थित राहण्याचे आदेश मुख्य प्रतोद रमेश बोरनारे यांनी व्हीपद्वारे दिला आहे.

---

# मराठा फाउंडेशनच्या मराठवाडा प्रदेश उपाध्यक्षपदी बालासाहेब फपाळ पाटील यांची निवड

बीड प्रतिनिधी :- बीड येथे मराठा फाउंडेशन सामाजिक संघटनेत काम करण्याची इच्छा लक्षात घेऊन मराठा समाजावर मराठा विद्यार्थ्यावर ज्या ठिकाणी अन्याय होईल तिथे धावून जाऊन आपण न्याय मिळवून देऊ अशी अपेक्षा आहे तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्नशील राहाल याकरता मराठा फाउंडेशन सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माननीय श्री बापूसाहेब बापू जाधव यांच्या व महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस श्री विजय सिताराम पोकळे यांच्या मान्यतेनुसार श्री बालासाहेब दामोधर फपाळ पाटील यांची मराठा फाउंडेशन सामाजिक संघटनेच्या मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे दिनांक ०७/१२ /२०२४ शनिवार रोजी बीड येथील जालना रोड वरील पंजाब इंटरनॅशनल बँकेच्या खाली माऊली मल्टीसर्विस कार्यलय येथे सर्व पदाधिकारी यांची बैठक घेण्यात आली या बैठकीमध्ये निवड करण्यात आली तसेच या पदावर नियुक्ती झाल्यामुळे मराठा फाउंडेशनची ध्येय आणि धोरणाचा तसेच माननीय श्री अध्यक्ष बापूसाहेब बापू जाधव यांच्या विचारांचा अधिक जोमाने प्रचार व प्रसार कराल अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी गेवराई तालुक्यातील रांजणी येथील सरपंच कु भाग्यश्री आसाराम रोडगे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी रोजगार रोजगार सेलचे जिल्हाध्यक्ष माननीय विजय दादा पोकळे मराठवाडा अध्यक्ष सतीश कुमार सोळंके शंकर सुस्कर.मनिषा सुस्कर वैभव पोकळे आदी उपस्थित होते यांनी श्री बालासाहेब फपाळ पाटील यांना मराठा फाउंडेशनचे नियुक्तीपत्र देऊन शाल श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले व पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

---

# सुसंस्कारशील पिढी घडविण्यासाठी मशिक्षणयोगी गौरवग्रंथ प्रेरणादायी - कुलगुरु डॉ.मनोहर चासकर

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात मागील ३७ वर्षांपासून अनेक उपयुक्त ठरतील असे शैक्षणिक उपक्रम राबविलेल्या राज्य पुरस्कारप्राप्त शिक्षक पंडित पवळे या व्यक्तिमत्त्वावरील मशिक्षणयोगीफ गौरवग्रंथ सुसंस्कारशील पिढी घडविण्यासाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ.मनोहर चासकर यांनी केले आहे. ते नांदेड येथील ताजपाटील हॉटेल सभागृहात मशिक्षणयोगीफ गौरवग्रंथ प्रकाशन प्रसंगी बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.कामाजी पवार होते. तर प्रमुख उपस्थितीत नांदेड परीक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक मा.शहाजी उमाप, मा.आ. मोहनअण्णा हंबर्डे, ॲड.डी. के. हांडे, माजी सनदी अधिकारी एकनाथ उर्फ अनिल मोरे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत, गोदातीरचे संपादक केशव घोणसे पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रेखा काळम, पूर्व अति.मु.अ. शिवाजीराव कपाळे, पूर्व शिक्षणाधिकारी शिवाजीराव खुडे, इंजि. शे.रा.पाटील, मधुकरराव देशमुख, कल्पना डोंगळीकर आदींची विशेष उपस्थिती होती. प्राचार्य डॉ.पंजाब चव्हाण यांनी संपादन आणि सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. जगदीश कदम यांनी पाठ राखण केलेला ५७ लेखांचा गौरवग्रंथ निर्मल प्रकाशनने प्रसिद्ध केला आहे.पुढे बोलताना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर म्हणाले, पंडित पवळे यांच्यात अनेक चांगले गुणविशेष आहेत. ते उत्कृष्ट काम करतात म्हणूनच एका जिल्हा परिषदेच्या शिक्षकावर गौरवग्रंथ वरिष्ठ महा विद्यालयाच्या प्राचार्यांनी संपादित केला ही गौरवाची गोष्ट आहे. चांगले शिक्षक कसे घडतील, हे आता आपणाला पाहावे लागणार असल्याचे ते म्हणाले.नांदेड परिक्षेत्राचे



पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी आपल्या भाषणात पंडित पवळे यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला.ते म्हणाले की पंडित पवळे यांच्यासारखे शिक्षक म्हणजे समाजाची बौद्धिक संपदा आहे.

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत आपल्या भाषणात म्हणाले की पंडित पवळे हे साने गुरुजींच्या परंपरेतील निष्ठावान शिक्षक आहेत. ग्रामीण भागात वाचन संस्कृती रुजविण्यासाठी प्रयत्न केले, ही फारच महत्त्वाची बाब आहे. पूर्व सनदी अधिकारी एकनाथ मोरे म्हणाले चांगल्या विद्यार्थ्यांची व विचारांची पाठराखण करणाया कुलगुरू व विशेष पोलीस महानिरीक्षकांच्या हातून एखाद्या जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकाच्या गौरवग्रंथाचे प्रकाशन होणे ही भाग्याची गोष्ट आहे. प्रसिद्ध विधिज्ञ ॲड.डी.के.हांडे यांनी विद्यार्थ्यांना दैवत मानणाया शिक्षकावरील गौरवग्रंथ सर्वांनी वाचण्याचे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोपात कामाजी पवार यांनी प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारणारे पंडित पवळे शिक्षक लाभणे, ही भाग्याची बाब असल्याचे सांगून पवळे यांनी पुढच्या काळात मराठा सेवा संघाच्या कार्यात वाहून घेण्याचे काम करावे, असे सांगितले.

प्रारंभी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मॉसाहेब, छत्रपती शिवराय यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन आणि अरूणा जाधव यांच्या सुरेल आवाजातील जिजाऊ वंदनेने प्रकाशन सोहळ्याची सुरूवात झाली. स्वागतपर मनोगत प्रकाशक निर्मलकुमार सूर्यवंशी यांनी, तर प्रास्ताविक प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण यांनी केले. तर सूत्रसंचालन इंजि. शिवाजीराजे पाटील यांनी केले.

या सोहळ्यास लेखक, समीक्षक, पत्रकार यांच्यासह सर्व समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ॲड.प्रशांत पवळे, दीपक पावडे, प्रा.डॉ. हनुमंत भोपाळे, पंडित कदम, ॲड.सतीश जाधव, संजय हंबर्डे, ॲड.प्रवीण मोरे यांच्यासह गौरवग्रंथ समिती, म.से.सं., जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड, वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेच्या सर्व पदाधिकर्यांनी व प्रकाशकांनी परिश्रम घेतले. शेवटी आभार मनोगतात उपस्थिता विषयी कृतज्ञता पंडित पवळे यांनी व्यक्त केली. यावेळी अनेकांनी पवळे दांपत्याचा हृद्य सत्कार केला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ९ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com


# भारताचा आशिया कप स्पर्धेत फ्लॉप शो, अंतिम फेरीत बांगलादेशने केल आऊट

## अंडर १९ आशिया कप स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताला धक्का बसला आहे.



भारताला रविवारी तिहेरी झटका बसला आहे. पहिल्यांदा कसोटीत, त्यानंतर वुमन्स संघाला वनडे मालिकेत आणि आता अंडर १९ भारतीय संघाला पराभवाचं तोंड पाहावं लागलं आहे. त्यामुळे रविवार भारतीय क्रीडाप्रेमींसाठी नकोसा वाटला. भारताने नाणेफेकीचा कौल जिंकल्यानंतर प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. बांगलादेशन ४९.१ षटकांचा सामना केला आणि सर्व गडी गमवून १९८ धावा केल्या आणि विजयासाठी १९९ धावांचं आव्हान दिलं. हे आव्हान काय भारतीय संघाला गाठता आलं नाही. भारताचा संपूर्ण संघ ३५.२ षटकात तंबूत परतला. भारताला फक्त १३९ धावा करता आल्या. बांगलादेशने भारताचा ५९ धावांनी दारूण पराभव केला. भारताचे आघाडीचे फलंदाज फेल गेले. या व्यतिरिक्त एकही फलंदाज मोठी कामगिरी करू शकला आंद्रे सिद्धार्थने आणि केपी कार्तिकेय यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनाही यश आलं नाही. आंद्रे सिद्धार्थने २० तर केपी कार्तिकेयने २१ धावा केल्या. कर्णधार मोहम्मद अमानने २६ धावा करत सामना पुढे नेण्याचा प्रयत्न केला. पण नंतर डाव घसरतच गेला. निखिल कुमारला आपलं खातंही खोलता आलं नाही. हरवंश सिंगने ६ धावा केल्या. तळाशी आलेल्या हार्दिकने २४ धावांची खेळी केली पण इतर खेळाडूंची साथ मिळाली नाही. बांगलादेशकडून मोहम्मद अझिझुल हकिम तामिम आणि इक्बाल होसेन इमोन यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले. अल फहादने २, मारुफ मृदा आणि मोहम्मद रिझान होसन यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. नाही. आयुष म्हात्रे १, तर आयपीएलमध्ये कोट्यवधींची बोली लागलेला वैभव सूर्यवंशी हा ९ धावा करून बाद झाला.

# जयदत्त आण्णा आदर्श राजकारणी : स्नेहल पवळ

लोकनेते जयदत्तजी आण्णा क्षीरसागर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त नगरसेविका सौ. जयश्री विलास विधाते यांच्या संकल्पनेतून स्त्री-शक्ती प्रतिष्ठान बीड द्वारा सुप्रसिद्ध डॉ. स्नेहल अक्षय पवळ यांचे दात केस त्वचा या विषयी मोफत प्राथमिक तपासणी आणि मार्गदर्शक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. स्नेहल पवळ यांनी आज आपण आण्णांच्या वाढदिवसानिमित्त या मोफत शिबीराच आयोजन केल असुन आण्णासाहेब हे एक आदर्श राजकारणी असुन शांत संयमी उच्च विद्याविभूषित नेतृत्वाने आपल्या राजकीय कारकीर्दीत ऐंशी टक्के समाजकारण आणि वीस टक्के राजकारण केले तेंव्हा वैद्यकीय क्षेत्रातही केवळ व्यावसायिक दृष्टिकोन न ठेवता ऐंशी टक्के व्यावसायिक आणि वीस टक्के सामाजिक दायित्व जपल पाहिजे. आपण हि एलीट ॲडव्हान्स डेंटल ण्ड कॉस्मेटीक सेंटर मधून दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी बीड शहरातील अंगणवाडीतील मुलांची मोफत दंत तपासणी करुत. आणि नवीन वर्षाच्या जानेवारी महिन्यात संक्रांत भेट म्हणून महिलांना स्किन ट्रिटमेंट मध्ये विशेष सुट देऊत असे सांगीतले. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून समाजसेविका वर्षाताई केंडे, संजीवनीताई पोकळे, निशाताई पवळ, प्रा. संगीताताई शिंदे,आरोग्य मार्गदर्शक राणीताई सानप ललीताताई भोसले यांची उपस्थिती लाभली होती.तर या तपासणी शिबिराचा परिसरातील बहुसंख्य महिला मुलींनी लाभ घेतला.



# हिवरा येथील आज हंगामाचे आयोजन

तालुक्यातील हिवरा येथे प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही मोठ्या प्रमाणात यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. हिवरा येथे खंडोबा मंदिर प्राचीन असून जागृत देवस्थान आहे. परंपरेनुसार सालाबादप्रमाणे भव्य दिव्य अशा यात्रा महोत्सवाचे आयोजन ग्रामस्थांमार्फत केले जाते. या यात्रेला जिल्ह्याभरातून भाविक भक्त मोठ्या संख्येने येत असतात. मंदिरात व मंदिराच्या बाहेरही विद्युत रोषणाई करण्यात आलेली आहे. यामुळे मंदिर परिसरात सुंदरतेची अधिकच भर पडली आहे. चंपाषष्ठी च्या दिवशी यात्रा भरवली जाते. पैठण वरून कावडीने पाणी आणले जाते व गावात मिरवणूक काढली जाते, शनिवारी सर्व लोकं तळी - भंडारा उचलण्याचा कार्यक्रम करतात. संध्याकाळी खंडोबाची आरती होते,नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम चालू असतो. गावांत पालखी मिरवणूक होते त्यामध्ये ढोल ताशा, डीजे, हलगी पथक, बँड यांचा समावेश असतो. रविवारी सकाळी मंदिर परिसरात सकाळ पासूनच वाघ्या मुरळीचा कार्यक्रमाचे आयोजन केलेले असते. यळकोट यळकोट जय मल्हारचा जयघोष चालू असतो. दिवसभर खेळणीचे, खाऊचे, दुकान सजलेली असतात. दुपारनंतर कुस्त्यांचा हंगामा भरवला जातो. तालुक्यासह इतर ठिकानहुन मल्ल येत असतात. यात्रेमुळे बाहेर गावी गेलेले लोकही मोठ्या प्रमाणात गावी आनंदाने येतात. दोन दिवस लोकं गुण्या गोविंदाने कार्यक्रमाचा आनंद घेतात. रविवारी होणाऱ्या यात्रोत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन यात्रा कमिटी सह गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आलेले आह

# घाटनांदूर-श्रीगोंदा रेल्वे मार्गाचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागू शकेल





मागील अनेक वर्षा पासून प्रस्तावित असलेल्या घाटनांदूर - श्रीगोंदा या अंबाजोगाई-केज-मांजरसुंबा मार्गे अहिल्या देवी नगर जिल्ह्यातून जाणाऱ्या रेल्वे मार्गाला गती मिळण्या साठी बीडचे खासदार बजरंग सोनवणे व अहिल्यानगरचे खासदार निलेश लंके यांनी विशेष प्रयत्न केल्यास हा प्रलंबित प्रश्न निश्चित मार्गी लागणार आसून हा प्रकल्प दोन्ही जिल्ह्याच्या विकासासह दळणवळणाच्या व रेल्वे खात्याला आर्थिक उत्पन्न देणारा ठरणार आहे. मागील अनेक वर्षा पासून घाटनांदूर-श्रीगोंदा या रेल्वे मार्गासाठी या पंचक्रोशीतील लोक आग्रही असून या रेल्वे मार्गाच्या मागणी साठी भाजपचे एकमेव निष्ठावंत कार्यकर्ते भारत पसारकर यांनी अनेक वेळा स्वतःच्या हस्ताक्षरात केंद्र सरकार कडे पाठपुरावा केलेला असून माजी खासदार डॉ प्रीतमताई मुंडे यांच्या कडे अंबाजोगाई जनाग्रह रेल्वे संघर्ष समितीने ही पाठपुरावा केलेला आहे. हा रेल्वेमार्ग पूर्ण व्हावा यासाठी तत्कालीन रेल्वेमंत्री सुरेश प्रभू अनुकूल होते. या रेल्वेमार्गामुळे अंबाजोगाई, केज, नेकनूर, मांजरसुंबा, पाटोदा, जामखेड या सह अनेक गावे रेल्वेमार्गावर येणार असून २६५ किमी अंतराचा मार्ग पूर्ण झाला






This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com